




दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २४३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.१४ एप्रिल २०२५










## थोडक्यात

### उबाठा गटाला धक्का ! यांचा झाला पक्षप्रवेश...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, मुंबई :** उबाठा गटाच्या उपनेत्या व प्रवक्त्या संजना घाडी आणि त्यांचे पती माजी नगरसेवक संजय घाडी यांनी रविवार, दिनांक १३ एप्रिल २०२५ रोजी शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी एकनाथ शिंदे यांनी त्यांचे पक्षात स्वागत करून आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या दृष्टीने पक्षवाढीसाठी सक्रिय होण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांच्यासह युवासेना विस्तारक सुयश घाडी, उपशाखाप्रमुख सागर पांचाळ, उपशाखाप्रमुख नितेश माने, समीर बोरकर, युवसेना मागाठाणे विधानसभा चिटणीस प्रदीप नेगी, युवासेना शाखा अधिकारी तानाजी जाधव, आशिष गावडे, मोहम्मद सय्यद यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांचा समावेश होता. गेल्या अडीच वर्षात कोणत्याही टिकेला प्रत्युत्तर न देता कामातून मुंबईसह राज्याच्या विकास करण्याला प्राधान्य दिले आहे. मुंबईत कोस्टल रोड, एमटीएचएल, मेट्रोचे जाळे विस्तारत असून सुशोभीकरण, रस्त्यांचे काँक्रीटीकरण, बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, डीप क्लिन ड्राइव्ह अशी अनेक कामे करण्यात आली आहेत. त्यामुळे महायुतीतील तिन्ही पक्ष टीम बनून असेच काम करत राहू असे याप्रसंगी स्पष्ट केले. यावेळी संजना घाडी यांना पक्षाच्या वतीने शिवसेना उपनेत्या आणि पक्ष प्रवक्त्या अशी दुहेरी जबाबदारी देण्यात आली.

ज्येष्ठ नगरसेवक राम रेपाळे यांच्या पुढाकाराने झालेल्या या पक्ष प्रवेश यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, महिला नेत्या मीनाताई कांबळी, सचिव संजय मोरे, माजी नगरसेविका राजुल पटेल, विभागप्रमुख स्वप्नील टेंभुलकर तसेच शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सरकारी वैद्यकीय महाविद्यालयील प्रोफेसरची हत्या...




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, नागपुर :** नागपुरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय-रुग्णालयातील फिजिओथेरपी विभागातील असिस्टंट प्रोफेसर महिलेचा राहत्या घरात खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. महिलेचा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह घरात आढळल्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. प्राथमिक तपासात महिलेच्या डोक्यावर रॉडने वार करून तिचा खून करण्यात आल्याचे निष्पन्न झाले असून हुडकेश्वर पोलिसांनी मृतदेहाचा पंचनामा करून तपास सुरू केला आहे.

मृत महिलेचे नाव अर्चना अनिल राहुले असून, त्या लाडेकर ले-आउट, हुडकेश्वर येथे राहत होत्या. अर्चना यांचे पती अनिल राहुले हे रायपूरच्या मेडिकल कॉलेजमध्ये प्रोफेसर आहेत. ते आठवड्यातून एक-दोन दिवस नागपुरात येत असतात. शनिवारी सायंकाळी अनिल नागपुरात आले. घरी पोहोचल्यानंतर त्यांना घरातून दुर्गंधी येत असल्याची जाणीव झाली. घरात गेल्यानंतर त्यांना पत्नी अर्चनाचा मृतदेह बेडजवळ पडलेला आढळला. त्यांच्या डोक्यात रॉडने मारण्यात आल्यामुळे मृतदेहाच्या शेजारी सुकलेले रक्त दिसून आले. त्यांनी ही माहिती शेजाऱ्यांना दिल्यानंतर, शेजाऱ्यांनी पोलिसांना सूचित केलं. हुडकेश्वर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून, खुनाचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. मृत अर्चना यांचा मुलगा हाही करीमनगर येथे एमबीबीएसचे शिक्षण घेत आहे. चोराच्या उद्देशाने हा खून झाल्याचा संशय पोलिसांकडून व्यक्त करण्यात आला आहे.

## बीड जिल्हा हादरला ! जुन्या वादातून आई-मुलाचे अपहरण करून अमानुष मारहाण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, बीड :** बीड जिल्ह्यात पुन्हा एकदा मारहाणीची धक्कादायक घटना समोर आली आहे. शिरूर तालुक्यातील घाटशीळ पारगाव येथे जुन्या वादातून एका तरुणासह त्याच्या आईचे अपहरण करून त्यांना अमानुष मारहाण करण्यात आली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, कृष्णा दादासाहेब घोडके असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, अज्ञात व्यक्तींनी कृष्णा आणि त्यांच्या आईचे प्रथम अपहरण केले. त्यानंतर त्यांना अज्ञात स्थळी नेऊन बेदम मारहाण केली. या मारहाणीत कृष्णा यांच्या शरीरावर गंभीर जखमा झाल्या आहेत, ज्याचे दृश्य विचलित करणारे आहे.

या गंभीर घटनेची तक्रार शिरूर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदवला असून, आरोपींचा शोध सुरू केला आहे. मात्र, घटनेला काही तास उलटूनही अद्याप आरोपी फरार आहेत. यामुळे पीडित कुटुंबांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

पीडित कुटुंबांनी बीडच्या पोलीस अधीक्षकांना निवेदन देऊन आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी केली आहे. त्यांनी प्रशासनाला या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कारवाई करण्याची विनंती केली आहे.

बीड जिल्ह्यात गुन्हेगारी वाढत असल्याच्या घटनांमध्ये ही आणखी एक भर पडली आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, पोलीस प्रशासनाकडून कठोर कारवाईची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आरोपींना लवकरात लवकर अटक करून पीडितांना न्याय मिळवून देणे गरजेचे आहे, अशी मागणी करण्यात येत आहे.

## अवकाळी पावसाचा कहर : गारपिटीचा शेतकऱ्यांना तडाखा !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, माळशेज :** माळशेज घाट परिसरासह पिंपळगाव जोगा, मढ, पारगाव आणि आजूबाजूच्या गावांमध्ये रविवारी दुपार नंतर अचानक आलेल्या अवकाळी पावसाने थैमान घातले. जोरदार वाऱ्यांसह पडलेल्या पावसामुळे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ वर अनेक झाडे उन्मळून पडली. त्यामुळे घाट परिसरात वाहतूक संपूर्णपणे ठप्प झाली होती.

या पावसामुळे मढ पारगाव व माळशेज घाटाच्या माथ्यावर गारांचा मोठा खच साचला होता. रस्त्यांवर गारांचा थर पडल्यामुळे वाहनचालकांना मोठ्या



अडचणींचा सामना करावा लागला. अनेक वाहनांचे चाक घसरत असल्याने अपघाताचीही शक्यता निर्माण झाली होती.

वाहतूक कोंडीमुळे शेकडो प्रवासी रस्त्यावर अडकले होते. प्रशासनाच्या मदतीपूर्वी स्थानिक नागरिक आणि प्रवाशांनीच पुढाकार घेऊन रस्त्यावरील झाडांचे अडथळे दूर केले. हातात कुठलीही साधने नसतानाही लोकांनी एकत्र येत रस्ते मोकळे केले आणि वाहतूक हळूहळू सुरळीत करण्यात यश मिळाले.

या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. माढ, पारगाव, पिंपळगाव जोगा परिसरात हरभरा, गहू, कांदा, भाजीपाला आदी पिकांवर गारपिटीचा जोरदार तडाखा बसला आहे. शेतकऱ्यांनी उभ्या पिकांमध्ये मोठी गुंतवणूक केली होती, मात्र या पावसाने त्यांच्या मेहनतीवर पाणी फिरवले आहे.

## जिल्ह्यात अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारणार - सभापती प्रा. राम शिंदे

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, नांदेड :** अनेक वर्षापासून जिल्ह्यात अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारण्याची मागणी आहे. या मागणीच्या अनुषंगाने पुढील वर्षापर्यंत म्हणजेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीपर्यत त्यांचे स्मारक उभारणी करण्यात येईल, अशी ग्वाही विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिली. रविवार, दिनांक १३ एप्रिल २०२५ रोजी नांदेड येथे मातोश्री मंगल कार्यालय, कौठा येथे धनगर सम ाजाच्यावतीने त्यांचा सत्कार आयोजित केला होता. यावेळी ते बोलत होते. सम ाजातील वंचित, शोषित,उपेक्षित घटकांच्या कल्याणासाठी जे-जे करता येईल ते कामे करण्यावर भर दिला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार बाबुराव कोहळीकर, आमदार आनंदराव बोंढारकर, आमदार श्रीजया चव्हाण तसेच अनेक पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. आतापर्यंत धनगर समाजाच्या विकासासाठी संविधानिक मार्गाने जे-जे करता येईल ते सर्व कामे केली आहेत. यापुढे ही नियम ांच्या चौकटीत राहून संविधानिक मार्गाने वंचित घटकांना न्याय मिळावा यादृष्टीने काम करण्यावर भर देण्यात येईल, असे आश्वासन सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले. समाजाच्या सर्व मागण्या बाबत सकारात्मकपणे शासनाकडे बाजू मांडण्यात येईल. ती कामे पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

मराठवाड्याचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न - खासदार अशोक चव्हाण

महाराष्ट्रातील तळागाळातील उपेक्षित घटकाला न्याय मिळाला पाहिजे. यासाठी सर्वांनी मिळून काम करणे गरजेचे आहे. उपेक्षित वर्गाला कायदेशिर मार्ग काढून टिकणारे आरक्षण मिळाले पाहिजे. वंचित घटकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी संविधानिक मार्गाचा अवलंब करुन प्रश्न सोडविण्यावर भर देण्यात येईल, असे खासदार अशोक चव्हाण यांनी सांगितले.

तसेच शासन स्तरावर नांदेडच्या विकास कामाबाबत मागणी केली असून याबाबत लवकरच शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल ,असे आश्वासन मुख्यमंत्री म होदयांनी दिले असल्याची माहिती खासदार अशोक चव्हाण यांनी दिली.




## बाबासाहेबांची पत्रकारिता

विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची आज १३४ वी जयंती. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन! जागतिक कीर्तीचे विचारवंत अशी ओळख आलेल्या विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. आधुनिक भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारे विचारवंत म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जगभर ओळख आहे मात्र डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ज्या जाहिराती किंवा शुभेच्छा संदेश दिल्या जातात त्यात डॉ बाबासाहेब आंबेडकरांची ओळख दलितांचे उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार अशीच करून दिली जाते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे दलीत उद्धाराचे कार्य तर जगजाहीर आहे. जगाला हेवा वाटेल अशी राज्यघटना त्यांनी देशाला दिली. त्यांनी दिलेल्या राज्यघटनेमुळेच विविध जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असलेला आपला देश एकसंघपणे बांधला गेला आहे. भारतासारखी राज्यघटना नसल्याने भारताच्या शेजारी असलेल्या देशांची आज काय अवस्था झाली आहे हे आपण पाहतोच आहे. त्यामुळे त्यांची दलीत उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ही ओळख यथायोग्यच असली तरी त्यांचे कार्य केवळ एवढ्या पुरतेच मर्यादित नाही. थोर अर्थतज्ज्ञ, महिलांचे उद्धारक, कृषी तज्ज्ञ, शिक्षण तज्ज्ञ, जलतज्ज्ञ इतिहास तज्ज्ञ, समाज शास्त्रज्ञ, कायदेपंडित, धर्म चिकित्सक, राजनीती तज्ज्ञ, कामगार नेते, शांतीचे उपासक, कलाप्रेमी, लेखक, पत्रकार असे विविध पैलू डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे हे विविध पैलू कायम दुर्लक्षित केले जातात म्हणूनच मी माझ्या महिलांचे उद्धारक डॉ बाबासाहेब आंबेडकर व डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे जलविषक धोरण या मागील दोन लेखात डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी महिलांसाठी केलेले कार्य आणि जलतज्ज्ञ डॉ बाबासाहेब आंबेडकर या दोन पैलूंची ओळख करून दिली होती आज मी डॉ बाबसाहेब आंबेडकरांची पत्रकार म्हणून असलेल्या पैलूंची ओळख करून देणार आहे.

डॉ बाबसाहेब आंबेडकरांचा पत्रकारितेचा प्रवास मूकनायक पासून सुरू झाला. नंतर हा प्रवास बहिष्कृत भारत, जनता व प्रबुद्ध भारत पर्यंत सुरूच राहिला. सामाजिक आणि राजकीय ध्येयासाठी स्वतःचे वर्तमानपत्र असावे असे डॉ बाबसाहेब आंबेडकरांना वाटले म्हणूनच त्यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक हे पाक्षिक सुरू केले. दलितांवर होणाऱ्या अन्याय,अत्याचाराला वाचा फोडण्याचं काम मूकनायक पाक्षिकानं निष्ठेनं केलं. डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते, तीची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे होते. सुरुवातीला पांडुरंग नंदराम भटकर पाक्षिकाचे संपादक होते. त्यानंतर मूकनायकाच्या व्यवस्थापकपदी असणारे ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांच्याकडे संपादक पदाची जबाबदारी आली. मूकनायक या पत्राने सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर स्थान निर्माण केले पाहिजे, ही जाणीव निर्माण केली. 'मूकनायक' पत्रात विविध विचार, वर्तमानसार, निवडक पत्रातील उतारे, क्षेम, समाचार, कुशल प्रश्न, शेला पागोटे ही सदरे होती. 'मूकनायक' एप्रिल १९२३ मधे बंद पडले.

इ.स. १९२४ मध्ये डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सुरू केले. ३ एप्रिल १९२४ रोजी बहिष्कृत भारत पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी २९ जून १९२८ रोजी समता हे वृत्तपत्र सुरू केले. हे समाज समता संघाचे मुखपत्र होते. २४ फेब्रुवारी १९३० रोजी त्यांनी जनता तर ४ फेब्रुवारी १९५६ मध्ये प्रबुद्ध भारत हे वृत्तपत्र सुरू केले. इ.स. १९४४ मध्ये बाबासाहेबांनी आम्ही शासनकर्ती जमात बनणार या शीर्षकाखाली जनता वृत्तपत्रात लेख लिहिला. या वृत्तपत्रांद्वारे आपल्या विचारांनी त्यांनी स्पृश्य आणि अस्पृश्यांना जागृत केले. त्यांची लेखनी झुंजार, क्रांतिकारी आणि प्रभावी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सर्व वृत्तपत्रे मराठी भाषेमध्ये प्रकाशित झालेत कारण मराठीच त्यावेळेची सामान्य जनतेची भाषा होती. कारण बाबासाहेबांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र होते आणि मराठी तिथली लोकभाषा आहे. बाबासाहेब इंग्रजी भाषेचे ही प्रकांड विद्वान होते, परंतु त्यांनी आपली वृत्तपत्रे मराठी भाषेत यामुळे प्रकाशित केली की त्यावेळी महाराष्ट्रातील बहुतांश दलित जनता जास्त शिकलेली नव्हती, ती केवळ मराठीत समजू शकत होती.गंगाधर पानतावणे यांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे की, या मुकनायकाने बहिष्कृत भारतामधील लोकांना प्रबुद्ध भारताकडे नेले. बाबासाहेब महान पत्रकार होते. पत्रकार महामानव डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!!

# पुस्तकप्रेमी बाबासाहेब....!



वाचाल तर वाचाल हे वाक्य केवळ तीन शब्दांचं आहे आणि एकूण आठ अक्षरांचं आहे. आजपर्यंत हजारो लाखो लोकांनी वाचले असेल. वास्तविक पाहता अगदी छोटसं,एक शब्द दोन वेळा येणारा अन एक शब्द एकदाच येणारं असं बाबासाहेबांनी अतिशय कमी शब्दात, मार्मिक अन जीवन बदलून टाकणारा मूलमंत्र आपल्याला दिला आहे.तो नक्कीच आपले जीवन बदलून टाकणारा आहे. बाबासाहेबांनी पुस्तकांना हृदयाशी कवटाळलं. त्यांच्यावर अपार माया केली. त्यांना जाणून घेतलं. त्यातून सत्य काय असत्य काय याची ओळख पटवून घेतली. अहो! एवढंच काय,बाबासाहेब या जगातील एकमेव पुस्तक प्रेमी की,ज्यांनी पुस्तकांसाठी घर बांधलं. पुस्तकाच्या ज्ञानातून अन्यायाविरुद्ध एक एक पाऊल पुढे टाकण्यासाठी धाव घेतली. अज्ञानी जगणं म्हणजे पशुवत जगणं होय.असे बाबासाहेब म्हणायचे. इतर प्राण्यांपेक्षा आपल्याला बुद्धी नावाची अलौकिक देणगी दिल्यामुळे, त्या बुद्धीला पुस्तकातील सुविचारांचे खाद्य दिल्यास,नक्कीच सत्कार्य घडवून आलेल. मग या बुद्धी, मेंदुसाठी खाद्य काय?तर पुस्तकांचं वाचन.....!यातून माणूस घडतो. स्वाभिमानी होतो. चांगल्या-वाईटांची जाणीव होते. अन्यायाविरुद्ध लढण्याची शक्ती निर्माण होते.आपण माणूस म्हणून जन्माला आलो आणि माणूस म्हणून जगतोय याची प्रचिती येते.

बाबासाहेबांचा जीवन संघर्ष सर्वश्रुत आहे. लहानपणापासून या समाजव्यवस्थेने त्यांना स्पृश-अस्पृश्य, जातीभेद यामुळे शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न केला.मात्र बाबासाहेबांच्या जिद्दी मनाने एकच ध्यास घेतला आणि तो म्हणजे शिक्षणाचा.....!मग ते कशाही पद्धतीने. वर्गात काय अन वर्गाबाहेर काय...! या ज्ञानाच्या उपासकाने मात्र ज्ञानाचा, शिक्षणाचा त्याग केला नाही. कारण त्यांना माहीत् होतं. हे ज्ञानच एक दिवस माझं तारणहार ठरणार आहे. हे पुस्तकच मला जगायला शिकवणार आहे. हे बाबासाहेबांना ज्ञात होतं. हणून बाबासाहेब म्हणतात जर तुमच्याकडे दोन रुपये असतील तर,एक रुपयाची भाकरी घ्या आणि एक रुपयाचे पुस्तक घ्या,कारण भाकरी तुम्हाला जगायला मदत करेल तर,पुस्तक कसे जगायचे ते शिकवेल अर्थात भाकरी इतकेच महत्त्व पुस्तकाला बाबासाहेबांनी दिले आहे. आणि हे तेवढेच खरं आहे.अहो! जगातील पडलेल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर तुम्हांला पुस्तकात सापडेल.अन्यत्र कुठेही नाही. मात्र शोकांतिका अशी की, इतर भौतिक आकर्षणाच्या गोष्टींवर बहू प्रमाणात खर्च होताना दिसून येत आहे. महागडे कपडे लत्ते,चैनीच्या वस्तू, मद्यप्राशन, इतर व्यसन यावर भरमसाठ खर्च तरुणमंडळी करत आहे. मात्र पुस्तकांचे दुकाने ओस पडत चालले आहे. कोणी असा संकल्प केला का की, आपल्या एकूण महिन्याच्या कमाईतून दहा टक्के रक्कम तरी पुस्तक खरेदीत वर करायचे. नाही ना...! मग बाबासाहेब सांगून गेले की, दोन रुपयांपैकी एक रुपयाची भाकर अन रुपयांचे पुस्तक विकत घ्या. अशा वेळेस आपण बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा चालवण्यात कुठेतरी कमी पडतोय असं म्हणायला हरकत नाही.. शेवटी मुद्दा येतो तेथेच वाचाल तर वाचाल कारण, येथे वाचाल याचा अर्थ जगण्यासाठी घेतला आहे. म्हणून जगणे शिकवण्यासाठी पुस्तक आवश्यक आहे हे बाबासाहेबांनी यासाठीच म्हटले आहे.वाक्य अगदी साधे सोपे आहे. कारण बाबासाहेबांना माहीत होतं,माझा हा समाज साधाभोळा, अडाणी, निरक्षर आहे,त्यांना साध्या -सोप्या भाषेत समजावून सांगितलं तर,लवकर समजेल.

शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो प्राशन करेल तो वाघासारखा गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.म्हणून बाबासाहेबांनी २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना केली. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या समाजाला त्यांच्या अधिकारांप्रती जाणीव करून देण्यासाठी, इंग्रजी राजवटीतील सायमन कमिशन कडे पत्र सादर केले.त्यात त्यांनी भूदल,नौदल, पोलीस खात्यात मागासवर्गीयांची भरती करण्याची मागणी केली.बहिष्कृत हितकारणी सभे मार्फत समस्त मागासलेल्या समाजातील तरुणांसाठी शाळा, वस्तीगृह, ग्रंथालय सुरू करण्यात आली. त्याचप्रमाणे डिस्प्रेड क्लासेस एज्युकेशन सोसायटी,दलित शिक्षण संस्था,पीपल्स एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून मुंबई येथे सिद्धार्थ कला विज्ञान महाविद्यालय तर संभाजीनगर (औ.बाद ) येथे मिलिंद महाविद्यालय त्याचप्रमाणे मुंबईत सिद्धार्थ विधी महाविद्यालय सुरू केले.या विद्यालयात हजारो तरुण-तरुणी शिक्षण घेत आहे. संपूर्ण देशभरात जवळपास ३० पेक्षा जास्त कॉलेज महाविद्यालय कार्यरत आहेत. याचा परिणाम स्वरूप आज संपूर्णसमाजातील तळागाळातील तरुण तरुणीना शिक्षणाचा अधिकार आहे. कारण बाबासाहेबांनी स्वतः शिक्षणाच्या बाबतीत ज्ञान मिळवण्यासाठी जातीयतेचे, स्पृश्य-अस्पृश्य तेचे चटके सहन केले होते. म्हणून माझ्या येणाऱ्या पिढीला सर्वांसाठी शिक्षणाची द्वारे खुली व्हावी हे बाबासाहेबांचे स्वप्न होते व ते पूर्णही झाले.

बाबासाहेब उच्च विद्या-विभूषित शिक्षण तज्ञ होते.त्याचबरोबर त्यांनी सर्व क्षेत्रात कार्य केले जसे की, राजकीय, सामाजिक, शेती विषयक,अंधश्रद्धा निर्मूलन,जातीभेद निर्मूलन, स्त्री मुक्ती चळवळ वगैरे.मात्र याठिकाणी प्रकर्षाने शैक्षणिक क्षेत्राचा बहु प्रमाणात लिखाणाचा उद्देश असा की,सध्याचा भरकटलेला तरुण वर्ग,व्यसनाधीनता, तरुण पिढीचा मोबाईल इंटरनेटचा अतिवापर त्यातील विदेशी सॉफ्टवेअर यात गुंतून राहिला आहे.सध्या गिबली,एआय सारख्या सॉफ्टवेअर च्या माध्यमातून कार्टून चित्र ॲनिमेशनच्या नांदात तुम्ही स्वतःचे खाजगी माहिती फोटो त्या कंपनीकडे सुपूर्द करत आहे.फोटो एडिटिंग करून समाजात अशांतता पसरवण्याचे कार्य करत आहे.कधीकाळी कार्टून म्हटले तर राग येणारा माणूस स्वतःला चित्राच्या माध्यमातून कार्टून करून घेत आहे.भयंकर शोकांतिका आहे. असो....! यामुळे कितीतरी तास मुले-मुली,तरुण तरुणी मोबाईल मध्ये गुंतून राहत आहे.त्यातून कितीतरी अनैतिक कार्य घडत आहे.मान्य आहे माहिती तंत्रज्ञानाने भयंकर प्रगती होत आहे परंतु, कुठेतरी नितीमूल्यांच्या शिक्षणाचा दर्जा खालवतांना दिसून येत आहे. कारण प्रत्येक गोष्ट या माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सहज उपलब्ध झाले आहे. एखादा विषय तुम्हाला शोधायचा आहे तर लगेच गुगलबाबा वर जाऊन शोधता आहे. मात्र, एखादं संदर्भ पुस्तक घेऊन त्यातील चार ओळी वाचून शंकेचं समाधान करत नाही कारण, आपणास सर्व रेडीमेड मटेरियल हवे आहे. या नादात आपलं स्वतःचं नेमकं काय?स्वतःची नवीन नवनिर्माण क्षमता नाही. कोणीतरी करतय म्हणून केवळ अनुकरण करत आहे.रील्स च्या माध्यमातून केवळ प्रसिद्धी साठी अतिशय विचित्र,अश्लील चित्राफिती तयार करत आहे.स्वतःच्या बुद्धी कौशल्याचा वापर करून स्वतःच असं काहीच नाही.अर्थात आपण या मोबाईल, संगणक इंटरनेटच्या पूर्णतः अधीन झालो आहे.कदाचित एक महिनाभर जर संपूर्ण इंटरनेट व मोबाईलच्या सुविधा बंद पडल्या तर..... तुम्ही तुमची ज्ञानाची भूक कशी भागवणार?

बाबासाहेबांच्या शैक्षणिक विचारांचं सॉफ्टवेअर हेच यावर प्रभावी माध्यम आहे. समाजात अश्लीलता पसरवणाऱ्या, तेढ निर्माण करणाऱ्या,कृत्रिम ज्ञान देणाऱ्या, कितीतरी शालेय विदयार्थी, महाविद्यालयीन तरुण-तरुणीचे आयुष्य उध्वस्त करणाऱ्या सॉफ्टवेअर पेक्षा बाबासाहेबांच्या शैक्षणिक विचारांचे सॉफ्टवेअर आयुष्यात कायम स्वरूपी डाऊनलोड करून घ्या व नव-नवीन पुस्तके वाचून त्याला अपडेट करत रहा. नक्कीच ! तुमच्या जीवनाचं सोनं झाल्याशिवाय राहणार नाही.

बाबासाहेबांनी समस्त मानव जातीला या अज्ञानरुपी अंधारातून बाहेर काढले.व दैदीप्यमान अश्या प्रकाश वाटेवर चालायला शिकवले.वाचाल तर वाचाल या छोट्याशा मूलमंत्रातून कितीतरी मौल्यवान सल्ला देऊन, हजारो -करोडो जनतेच्या जीवनाचा कायापालट केला. म्हणून आज पासून एक संकल्प करा की, या भौतिक आकर्षणाच्या, शोभेच्या व चैनीच्या वस्तूं तसेच धूम्रपान व मद्यप्राशनावरील व्यर्थ खर्च टाळून, पुस्तके व शैक्षणिक साहित्य गरजू व गोरगरीब विद्यार्थ्यांना वाटप करा कारण, हीच बाबासाहेबांची शिकवण आहे व हीच बाबासाहेबांना खरी मानवंदना आहे. आपल्या या पिढीने बाबासाहेबांना प्रत्यक्षात बघितले नाही परंतु,त्यांच्या विचारांचा वारसा कायम ठेवण्यासाठी आपण त्यांना पुस्तकात शोधू. पुस्तक म्हणजेच बाबासाहेब...! या पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञानाची कास धरू.बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा पुस्तक रूपाने कायम हृदयात ठेवू. समस्त मानव कल्याणाच्यासाठी प्रयत्न करू.

**पुस्तक प्रेमी विश्वरत्न महामानव**
**बाबासाहेबांना जयंती निमित्त विनम्र अभिवादन!**

***श्री.विनोद शेनफड जाधव***
***मासरूळ जि.बुलडाणा***
***मो.९७६३२८२०७७***

## मा.बाबासाहेब..

शतक लोटले तरी
झळाळे सूर्य निळा
दिले दिवस सुखाचे
सोसल्या तूचं कळा

भाकरी पेक्षा अधिक
पुस्तकांचा तव लळा
शिक्षण मिळो सर्वां
परिवर्तनां कळवळा

धम्म चक्र प्रवर्तनाने
खुले मार्ग नव वेगळा
संविधान दिले देशा
प्रगत भारत आगळा

ते पहिले कायदामंत्री
नियम सगळे पाळा
निर्बंध उठले तरीही
गर्दी गोंधळास टाळा

तू प्राणवायू समाजा
किर्ती रुपाचा दर्वळा
जाती पाती पलीकडे
प्राण प्रिय तू सकळा

महिला सक्षम सुरक्षी
श्वास घेतात मोकळा
संघटीत हो कामगार
घास खातात कवळा

अस्तित्वाची जाणीव
राहे जागे जळास्थळा
भेट द्यावी एकदा तरी
महू गाव जन्म स्थळा

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# अष्टविनायक मंदिरांतील ड्रेसकोड स्वागतार्ह !



मुंबईतील श्री सिद्धिविनायक मंदिरात ड्रेसकोड लागू झाल्यानंतर आता राज्यातील अष्टविनायक मंदिरांतही ड्रेसकोड लागू करण्यात आला आहे. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी कोणते कपडे परिधान करून यावेत आणि कोणते कपडे परिधान करून मंदिरात प्रवेश निषिद्ध असेल याची सूचिच या मंदिरांच्या बाहेर लावली जाणार आहे. मंदिरातील सात्विकता अबाधित राहावी यासाठी मंदिर समित्यांनी घेतलेला हा निर्णय नक्कीच स्वागतार्ह आहे.

गेल्या ३-४ वर्षांत राज्यातील अनेक सुप्रसिद्ध मंदिरांत ड्रेसकोड लागू करण्यात आले आहेत. याचे श्रेय हिंदू जनजागृती समिती आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाला द्यावे लागेल. गेल्या काही वर्षांत त्यांनी राज्यातील मंदिरांच्या विश्वस्तांचे तसेच पुजाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात संघटन घडवून आणले. राज्यातील समस्त मंदिरांत भक्तांच्या सुविधेसाठी आणि मंदिराचे पावित्र्य अबाधित राहावे यासाठी काय काय करता येईल याविषयी चर्चा घडवून आणण्यासाठी आणि राज्यस्तरावर ध्येय धोरणे आखण्यासाठी अधिवेशने आणि शिबिरे यांचे आयोजन केले. ज्याची फलश्रुती आज विविध मंदिरांत दिसून येत आहे. आजवर या देशावर अनेक आक्रमकांनी हल्ले करून येथील वैभव लुटून नेले मात्र येथील संस्कृतीच्या खुणा त्यांना मिटवता आल्या नाही. या खुणा आणि त्यांचे पावित्र्य जतन करून ठेवण्यासाठी आपल्या पूर्वजांनी मोठे योगदान दिले आहे, त्यामुळे ते पावित्र्य टिकवून ठेवण्याचे दायित्व आता आपल्या खांद्यावर आहे. महाराष्ट्रात जेव्हा मंदिरांतून वस्त्रसंहिता लागू करण्याचा प्रस्ताव मांडला गेला तेव्हा समाजातून जसे या भूमिकेचे स्वागत झाले तसा यास काही पुरोगामी मंडळींकडून विरोधही करण्यात आला. तरीही मागील दोन वर्षांत राज्यातील अनेक मंदिरांनी ड्रेसकोड लागू केले आहेत. गेल्या काही वर्षांपासून गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सव काळात राज्यातील काही उत्सव मंडळांनीही श्रीच्या मंडपात वस्त्रसंहितेचे पालन करणे बंधनकारक केले. दक्षिण भारतातील अनेक मंदिरांत मागील शेकडो वर्षांपासून वस्त्रसंहिता लागू करण्यात आलेली आहे, त्या ठिकाणी महाराष्ट्रातून जाणारे भाविक त्याचे तंतोतंत पालन करतात, मग राज्यातील वस्त्रसंहितेला विरोध का ? मंदिरांच्या गाभाऱ्यात जाताना पुरुषांनी सोवळे आणि स्त्रियांनी साडी नेसावी ही प्रथा शेकडो वर्षांपासून चालत आली आहे, हे आपणा सर्वांना ज्ञात आहे, मग मंदिर परिसरातील वस्त्रसंहितेला आक्षेप नेमका कशासाठी ? मुळात मंदिरे ही काही सहलीची ठिकाणे नाहीत कि ज्या ठिकाणी कोणी मौज मजेसाठी यावे. मंदिरात येणाऱ्या प्रत्येकाला त्या देवतेचे दर्शन घ्यायचे असते, देवतेच्या मूर्तितून प्रक्षेपित होणारे चैतन्य ग्रहण करायचे असते, आपले मागणे देवापुढे मांडायचे असते याचाच अर्थ तिथे देव प्रत्यक्ष आहे आणि तो आपले म्हणणे ऐकणार आहे अशी श्रद्धा येणाऱ्या प्रत्येकाच्या मनात असते मग त्या देवतेच्या ठिकाणचे पावित्र्य जपणे आपले कर्तव्य नव्हे का ? मुलांना शाळेत पाठवताना आपण शाळांनी ठरवून दिलेला गणवेश घालून त्यांना पाठवतो, कार्पोरेट कार्यालयांतही कपड्यांच्या बाबतीत कंपनीने घालून दिलेले नियम कर्मचाऱ्यांना पाळावे लागतात. रुग्णालये, न्यायालये, पोलीस, टपाल कार्यालय सर्वच ठिकाणी ड्रेसकोड आहेत आणि वर्षोनुवर्षे या ड्रेसकोडचे पालन होत आलेले आहे, मग देवालयांत जाताना आपल्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा कशी बरे येते ? कोरोना काळात कोरोना रुग्णांना भेटायला जाताना पीपीई किट परिधान करून जाणे बंधनकारक करण्यात आले होते. त्यावेळी ते नियम डॉक्टरांनी केले होते म्हणून आपण सर्वानीच ते पाळले. मग धार्मिक स्थळांच्या बाबतीत धर्म आणि अध्यात्मशास्त्र जाणणाऱ्या मंडळींनी केलेले नियम आपल्याला मान्य का होत नाहीत ? देशाचे पंतप्रधान सुद्धा विविध मंदिरांत जाताना तेथील ड्रेसकोडचे पालन करतात. चित्रपटात अंग प्रदर्शन करणाऱ्या हॉलिवूड-बॉलिवूडमधील नायिकाही मंदिरांत जाताना साजेशी वस्त्र परिधान करतात, डोक्यावर पदर घेतात मग आपण या नियमांना विरोध करून नेमके कोणते पुढारलेपण दाखवत आहोत ? पुरातन मंदिरे ज्यावेळी निर्माण करण्यात आली त्यावेळी सामान्य लोकांचे पोशाख हे सात्विक आणि धर्माला अनुसरून होते त्यामुळे त्यावेळी वस्त्रसंहिता बनवण्याची गरजच निर्माण झालेली नव्हती. आताच्या पिढीवर असलेला पाश्चात्य संस्कृतीचा पगडा, धार्मिक स्थळांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला गेल्याने वस्त्रसंहिता लागू करणे आज अनिवार्य झाले आहे. मंदिरे ही पर्यटनाची केंद्रे नसून ती धार्मिक स्थळे आहेत. त्यामुळे अशा ठिकाणी योग्य ती शुचिर्भूतता पाळली जावी, मंदिरांचे पावित्र्य राखले जावे, मंदिरांत येणाऱ्या भाविकांचा देवतेप्रतीचा भाव टिकून राहावा यासाठी तोकडे आणि निषिद्ध कपडे परिधान करून मंदिरांत प्रवेश करण्यास अनेक देवस्थानांकडून घालण्यात आलेली बंदी स्वागतार्ह आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
**हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.**
**या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत.** Email : newsaksharaj2021@gmail.com **संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२**

अक्षराज

३ | बुलडाणा, सोमवार, दि. १४ एप्रिल २०२५ | संमिश्र

# थोडक्यात

## पारसीवाडी येथे हनुमान जन्मोत्सव साजरा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, मुंबई :** धर्मवीर संभाजी मित्र मंडळ संचालित श्री हनुमान जन्मोत्सव २०२५ चे आयोजन हनुमान मंदिर, धर्मवीर संभाजी चौक, चिरागनगर, घाटकोपर (प.), मुंबई- ८६ या ठिकाणी करण्यात आले होते.यावर्षी मंडळाचे हे ५६ वे वर्ष होते. तीन दिवसीय चालणार्या कार्यक्रमात गुरुवारी लहान मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शुक्रवारी महिलांसाठी हळदी कुंकु व रात्री जागरण गोंधळ कार्यक्रम (देवी भक्त गोंधळ जागरण पार्टी)चे आयोजन करण्यात आले होते. शनिवारी सांप्रदायिक भजन श्री काळभैरवनाथ प्रासादिक भजन मंडळाचा कीर्तनचा कार्यक्रम करण्यात आला नंतर हनुमान जन्मोत्सव महाप्रसाद (भंडारा) आयोजन करण्यात आले होते. दरवर्षी मंडळाच्या वतीने हनुमान जन्मोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. विभागातील नागरिकाचा देखील उत्स्फूर्तपणे प्रतिसाद या भंडाऱ्यासाठी मिळतो.धर्मवीर संभाजी मित्र मंडळाच्या वतीने सण उत्सव मोठ्या हर्ष उल्हासात साजरे केले जातात. या मध्ये मंडळाचे सर्व पुरुष व महिला चा मोठा प्रतिसाद पाहण्यास मिळतो.

## जानकाई विद्यालयाचे विद्यार्थी NMMS शिष्यवृत्तीसाठी पात्र



**अक्षराज : दिपक शिवले**

**दि.१३, कळवण (नाशिक) :** कळवण शहरातील नामांकित जानकाई प्राथ.व माध्यमिक विद्यालय कळवण दरवर्षी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उज्वल यश संपादन करण्यामध्ये अग्रेसर ठरत असते. याहीवर्षी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक प्रज्ञाशोध परीक्षा २०२५ दि. २२ डिसेंबर २०२४ रोजी आर.के.एम.विद्यालय या केंद्रावर पार पडली. सदर परीक्षेचे स्वरूप हे १८० गुणांसाठी २ पेपर घेण्यात येतात त्यात पात्रतेसाठी ७२ गुण(४०टक्के) आवश्यक असतात. तसेच पात्र विद्यार्थ्यांना १२ वी पर्यंतच्या शिक्षणासाठी वार्षिक १२ हजार रुपये शिष्यवृत्ती शासनाकडून दिली जाते. या परीक्षेत विद्यालयातील इयत्ता ८ वी या वर्गातील २८ विद्यार्थी बसलेले होते त्यात ३ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. कु. दर्शन हेमंत मोहन गुण-१०५, कु. पार्थ जगदीश पाटील गुण-८९, कु. राशी ज्ञानेश्वर सूर्यवंशी गुण- ७८ मिळवून घवघवीत यश संपादन करत यशाची परंपरा अबाधित ठेवली आहे. या विद्यार्थ्यांचे तसेच या स्पर्धा परीक्षांचे नियोजन व मार्गदर्शन करणारे शिक्षक एच.एस.दिक्षित यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत जगन्नाथ कोठावदे, विद्यालयाचे मुख्याध्यापक एम.बी.जोशी, एच. व्ही. दशपुते तसेच जेष्ठ शिक्षक व्ही.जी.जाधव, आर.एस.अमृतकार, व्ही.एम.कोतवाल, एस.एच.भामरे, के.बी.निकम, वाय.एन.वाघ, एस.एस.सुर्यवंशी, एम.डी.देवरे, एम.व्ही.देवघरे,आर.आर.सोनवणे, जे.एम.पगार, एस.के.शिरसाठ, एच.के.सोनवणे, एस.एस.जाधव. एस.के.चव्हाण, व्ही.एम.खैरे, दुबे सर,सर्व पुर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन व कौतुक केले आणि भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## कान्हुरपठार येथे आज मळगंगा मंदिराचा कलशारोहण



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील कान्हुरपठार परिसरातील भाविकांचे श्रद्धास्थान व कुलदैवत असलेल्या माता मळगंगा देवीच्या मंदिराचा कळसाचा भव्य कलशारोहण सोहळा आज सोमवारी (दि.१४ ) हभप एकनाथ महाराज चत्तर (शास्त्री) व हभप गोविंद महाराज (आळंदी) यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न होणार असून. यानिमित्ताने मळगंगा मंदिर समिती व ग्रामस्थांच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये कळस व मूर्तीची संपूर्ण गावातून ग्रामप्रदक्षिणा मिरवणूक, होमहवन भेदिक, भजन, कीर्तन, देवदर्शन झाल्यावर सायंकाळी महाप्रसाद असे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. कान्हुरपठार परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन मंदिर समिती व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

नवसाला पावणारी देवी म्हणून माता मळगंगा देवीची अख्यायिका आहे. याच एप्रिल महिन्यात १८ व १९ तारखेला देवीची मुख्य यात्रोउत्सव आहे. नवीनच माता मळगंगा देवीच्या मंदिराचा जीर्णोद्धार झाल्याने गावातील महिला व भाविकांमध्ये यात्रेचा मोठा उत्साह दिसून येत आहे. यात्रेचे नियोजनही ग्रामस्थांनी केले आहे.

## संविधानात लोककल्याणाची संकल्पना अंतर्भूत : धायगुडे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, चंद्रपूर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान निर्मितीसाठी कठोर परिश्रम घेतले आहे. संविधानातील सर्व घटकांना सामाजिक न्याय, समतेचे मुल्य, बंधुत्व, लोकशाही, राजकीय, समाजवादी विचार आपणांस प्रेरणादायी आहे. खऱ्या अर्थाने संविधानात लोककल्याणाची संकल्पना अंतर्भूत आहे, असे प्रतिपादन जिल्हा परीषद जिल्हा ग्रामीण यंत्रणेचे प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी गिरीष धायगुडे विसापूर येथे केले. बल्लारपूर तालुक्यातील विसापूर येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात चंद्रपूर जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग, बल्लारपूर पंचायत समिती, व विसापूर ग्रामपंचायत च्या वतीने 'घर घर संविधान' उपक्रमांतर्गत अश्विनी रोशन यांचा प्रबोधनात्मक संविधान जागर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळीच उद्घाटक म्हणून ते मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच वर्षा कुळमेथे, तर प्रमुख अतिथी म्हणून बल्लारपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी धनंजय साळवे, प्रभारी तहसीलदार महेंद्र फुलझेले, गटशिक्षणाधिकारी रविंद्र लामगे, विसापूरचे उपसरपंच अनेकश्वर मेश्राम, ग्राम पंचायत सदस्या शारदा डाहुले, रिना कांबळे, वैशाली पुणेकर आदींची उपस्थिती होती.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आणि भारतीय संविधान अमृत महोत्सवानिमित्त एकदिवसीय कार्यशाळा



**अक्षराज : चंदन सिंह**

**दि.१२, नवी मुंबई :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आणि भारतीय संविधानाच्या अमृत म होत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेली एकदिवसीय कार्यशाळा उदयोन्मुख वकिलांसाठी आज डॉ. डी. वाय. पाटील लॉ कॉलेज, नेरुळ येथे यशस्वीपणे पार पडली. कार्यशाळेची सुरुवात सकाळी ९ वाजता झाली, जिथे नोंदणी प्रक्रियेनंतर सहभागींचे स्वागत नाश्त्याने करण्यात आले. देशातील सर्वोच्च न्यायालयीन विचारधारेवर भाष्य करणारे, तज्ज्ञ वक्त्यांचे विविध सत्र हे कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले.

मा. न्यायमूर्ती राजेश पाटील( बॉम्बे हाई कोर्ट न्यायाधीश)यांनी ऋखठ रद्द करण्यावरील न्यायालयीन भूमिका आणि संयम या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. ॲड. सुदीप पासबोला (महाराष्ट्र ॲंड गोवा बार काउंसिल अध्यक्ष)यांनी क्रॉस-एक्झॅमिनेशनचे कौशल्य या विषयावर अत्यंत माहितीपूर्ण सत्र घेतले. ॲड. अखिलेश दुबे यांनी PMCA कायद्याचा संक्षिप्त परिचय दिला. ॲड. गणेश शिरसाट यांनी केशवानंद भारती खटल्याच्या अज्ञात पैलूंवर प्रकाश टाकला. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) कायदेशीर संशोधनात कशी मदत करू शकते, यावरही एक विचारप्रवर्तक सादरीकरण झाले.

कार्यशाळेदरम्यान ३०० पेक्षा जास्त अधिवक्ते सहभागी घेतले होते आणि सहभागींसाठी नाश्ता, दुपारचे जेवण आणि चहा/कॉफी यांची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. उपस्थितांना ई-प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन ॲड. सुनील मोकल (अध्यक्ष, नवी मुंबई कोर्ट बार असोसिएशन) आणि ॲड. करुणा अक्षय माळवीय (संचालिका, डी. वाय. पाटील लॉ स्कूल) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या ज्ञानवर्धक आणि संवादात्मक कार्यशाळेने उपस्थितांना संविधानाच्या मूल्यांची आठवण करून दिली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना एका अर्थपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

# धुळ्यात 'जय भीम पदयात्रा' उत्साहात संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, धुळे :** भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंतीचे औचित्य साधुन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,धुळे व जिल्हा प्रशासन, सर्व शैक्षणिक संस्था, विद्यापीठ, एनएसएस, एनसीसी, एनवायके, विविध खेळ संघटना व इतर यांच्या संयुक्त विद्यमाने आज 'जय भीम पदयात्रा' उत्साहात संपन्न झाली.

राज्य शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ व्या जयंती निमित्ताने जिल्हयात 'जय भीम पदयात्रा' चे आयोजन करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार गरुड मैदान येथे भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करुन शिक्षण विस्तार अधिकारी सुधाकर बागुल, श्रीमती मनीषा वानखेडे, क्रीडा अधिकारी श्रीमती रेखा पाटील यांच्या हस्ते पदयात्रेस हिरवी झेंडी दाखवून सुरुवात करण्यात आली.

या पदयात्रेत जी.आर.सिटी हायस्कुल, न्यू सिटी हायस्कुल, शिवाजी हायस्कुल, कमलाबाई कन्या शाळा, नेहरु युवा केंद्र, खेळाडू, प्रशिक्षक तसेच सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

यात्रेसाठी आलेले विद्यार्थी खेळाडूमार्फत गरुड मैदान येथे संपूर्ण परिसर तसेच बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवडील परिसर ही स्वच्छ करण्यात आला. पदयात्रेची सुरवात गरुड मैदान,धुळे येथुन



सुरुवात होवुन जेल रोड मार्गे पोलीस अधिक्षक कार्यालयाजवळील म हामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ समारोप करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीधर कोठावदे तर श्रीमती मनीषा वानखेडे यांनी आभार मानले.

पदयात्रा यशस्वी करण्यासाठी स्वप्निल बोंडे, श्रीधर कोठावदे, योगेश देवरे, प्रभा परदेशी, योगेश पाटील, राहुल देवरे, ज्ञानेश्वर जाधव, दिनेश शिरसाठ, तसेच शाळेतील शिक्षक सुनंदा अहिरे, देविदास मोरे, मनोज चौधरी, महेंद्र गावडे, एस. एम. पाटील, वानखेडे सर, रवींद्र भामरे, तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील योगेश देवरे, दिनेश शिरसाट, योगेश पाटील, राहुल देवरे यांनी परिश्रम घेतले.

# कोराडी येथे २९५ गरजूंची नि:शुल्क आरोग्य तपासणी...

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१३, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या कामठी तालुक्यातील कोराडी येथे क्रांतिवीर श्यामलालबाबू शीवास स्मृती बहुद्देशीय संस्थाच्यावतीने राज्याचे महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती प्रित्यर्थ म हादुला- कोराडी परिसरातील गरजु लोकांकरिता मोफत आरोग्य तपासणी व औषध वितरण शिबीर १२ एप्रिल रोजी घेण्यात आले.

शिबिरात इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर, शासकीय वैद्यकीय दंत म हाविद्यालय व रुग्णालय, नागपूर आशा हॉस्पिटल, कामठी यांच्या सहकार्याने २९५ जनांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यात नेत्ररोग, दंत रोग, स्त्री रोग तपासणी करण्यात आली. १६ शिबिरार्थी नेत्र तपासणी



दरम्यान मोतीयाबिंदू शस्त्रक्रिया करिता पात्र ठरले असून शासनाच्या योजनेम धून संस्थेच्या पुढाकाराने शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. शिबिराला नेत्ररोग तज्ञ डॉ. प्रशांत मेश्राम, डॉ. नयना खंडारे, दंत रोग तज्ञ अनिकेत धोटे, डॉ.रवि लिखितकर, डॉ. प्रियंका चौरसिया यांचे सहकार्य लाभले.

शिबिराचे उद्घाटन म हानिर्मितीचे कार्यकारी संचालक विवेक रोकडे यांच्या हस्ते झाले तर प्रमुख अतिथी म्हणून कोराडी वीज केंद्राचे मुख्य अभियंता विलास मोटघरे, अधीक्षक अभियंता शिरीष वाठ, महादुला नगरपंचायतचे मुख्याधिकारी अमर हांडा, महादुला नगरपंचायतचे माजी अध्यक्ष राजेश रंगारी, माजी गटनेता राम तोडवाल, सामाजिक कार्यकर्ते पंकज ढोणे, मनोज सावजी, धनंजय भालेराव, मोहसीन शेख, प्रितम लोहासारवा, वरठी, मुख्याध्यापिका सरोज वालदे, पवन पखीड्डे, विजय जैन, अंकुश समरीत, शिवराज जनबंधू, गोपाल गोडबोले, जितेश भगत, ज्ञानेश्वर लाडे, राहुल बागडे, अजय शाहू, किरण कटरे, मोहित मेश्राम, बाल्या भाऊ गवळी, रंजना पखीड्डे तसेच संस्थेचे अधिकारी पदाधिकारी राजेश मछले, शंकर शेंडे, मुन्ना मेश्राम, घनश्याम मेश्राम, पुरण आगासे, म नमिता गोडबोले, हुकूमचंद जनबंधू आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

शिबिर यशस्वीतेकरिता विश्वनाथ चव्हाण, महेश बोन्डे, अजय सोलंकी, बापूराव सोनवणे, राहुल इंगोले, स्नेहल मेश्राम, निलेश वानखेडे, प्रितेश वानखेडे, राजेश बोरकर, प्रफुल नारनवरे, राकेश करसायल, अभिजित इंगोले, निरंजन वालदे, सुमित मेघराज, उमेश बावनकर, योगेश मेश्राम, अतुल इंगोले, कमलेश खोब्रागडे, प्रविण घोडेस्वार, राजकुमार नारनवरे, सचिन इंगोले, विक्की खरवडे, अनिकेत वाणी, सोनू बोरकर, मनोज वाकले, महेंद्र नेवारे, सागर मडावी, राज उके, शोभा इंगोले, वर्षा तानोडे, निकिता लोणारे, दुर्गा इंगोले, आम्रपाली बन्सोड, शांता खोब्रागडे यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार आरोग्य शिबिराचे संयोजक अमरजीत गोडबोले यांनी केले.

# चंद्रपूर जिल्ह्यात १०० दिवसांच्या कृती आराखड्याची यशस्वी अंमलबजावणी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, चंद्रपूर :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्य शासनाने सर्व शासकीय विभागांसाठी १०० दिवसांचा कृती आराखडा तयार केला आहे. सामान्य नागरिकांना शासकीय कार्यालयात उत्तम सेवा मि ळावी, हा संकल्प कृती आराखड्यामागे असून आतापर्यंत विविध विभागामार्फत जिल्ह्यात झालेल्या अंमलबजावणीचा आढावा राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी घेतला.

वन अकादमी येथे आयोजित बैठकीला जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, महानगरपालिका आयुक्त विपिन पालीवाल, उपमुख्य कार्यकारी



अधिकारी मीना साळुंखे, गिरीश धायगुडे पालिका प्रशासन अधिकारी विद्या गायकवाड, आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार, व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावेळी बोलताना पालकमंत्री डॉ. अशोक उईके म्हणाले, जिल्हा प्रशासनाने ई-ऑफिस ही संकल्पना प्रभावीपणे राबविले असून जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालय तसेच तहसील कार्यालय ई-ऑफिसने जोडले आहे ही अतिशय कौतुकास्पद बाब आहे. कृती आराखड्यांतर्गत सर्व शासकीय विभागांनी आपापले संकेतस्थळ अद्यावत करुन नागरिकांना उत्तम सेवा मिळेल, यासाठी गांभियेने काम करावे. सर्व शासकीय कार्यालयाम ध्ये महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालय असणे आवश्यक आहे. तसेच उत्तम पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, अभ्यागतांसाठी प्रतिक्षालय सुद्धा असावे.

राज्य शासनाने दिलेल्या कृती आराखड्यानुसार सर्व विभागांनी कार्यवाही करावी. जिल्हा परिषदेअंतर्गत सर्व पंचायत समितीमध्ये नियमितपणे स्वच्छता, स्वतंत्र शौचालय असली पाहिजे. तसेच क्षेत्रीय कार्यालयांनी भेटीच्या नोंदी अद्यावत ठेवाव्यात. जिल्हा परिषदेमध्ये नविन शैक्षणिक धोरणाचा प्रभावी उपयोग करुन विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावे. आरोग्य संस्थेत आलेल्या गोरगरिबांना चांगली सेवा द्यावी. पोलिस विभागाने नागरिकांसोबत सुसंवाद वाढवावा, यासाठी विशेष मोहीम राबविणे गरजेचे आहे. गुन्ह्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी कायदेविषयक जनजागृती करावी, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

# आ.मुनगंटीवार यांच्यामुळे आराध्याच्या कानाला लाभले आनंदाचे सूर

## वाघमारे कुटुंबाने मानले आ.मुनगंटीवार यांचे आभार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे एका कुटुंबातील लाडक्या लेकीच्या कानांना आनंदाचे सूर लाभले. सामाजिक भावनेतून निःस्वार्थ कार्य करणारे आ.मुनगंटीवार यांनी पुन्हा एकदा आनंदाची पेरणी करण्याचे काम केले आहे. निमित्त ठरले वाघमारे कुटुंबाचे. चंद्रपूर शहरातील नेहरू नगर वार्डात राहणाऱ्या वाघमारे कुटुंबियांसाठी १२ एप्रिल २०२५ हा दिवस आयुष्यभर लक्षात राहणारा ठरला. त्यांची मुलगी आराध्या मंगेश वाघमारे हिची कॉक्लियर इम्प्लांट ही अत्यंत महत्त्वाची आणि क्लिष्ट शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. आ.मुनगंटीवार यांनी पुढाकार घेतला नसता तर आम्हाला आज हा आनंद अनुभवता आला नसता, या शब्दांत वाघमारे कुटुंबाने आभार व्यक्त केले आहेत.

आराध्या अवघी १ वर्षांची असताना दोन्ही कानांना पूर्णतः बहिरेपणा असल्याचे निदान झाले होते. त्यामुळे वाघमारे कुटुंब चिंतेत होते. प्राथमिक उपचारांमध्ये काहीच यश न मिळाल्यानंतर त्यांनी आ. सुधीर मुनगंटीवार यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी अत्यंत संवेदनशीलतेने या प्रकरणाकडे लक्ष दिले. सागर खडसे यांना वाघमारे कुटुंबाला सहकार्य करण्याचे निर्देश दिले. आ. मुनगंटीवार यांनी वेळोवेळी योग्य मदत व पाठबळ दिल्यामुळे टाटा ट्रस्ट यांच्या सहकार्याने नागपूर येथील ऑरेंज सिटी रुग्णालयात इएनटी सर्जन डॉ. श्वेता



लोहिया यांच्या मार्गदर्शनात आराध्याचे ऑपरेशन पार पडले. आज आराध्या ऐकू शकते, तिच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि तिच्या कुटुंबियांच्या डोळ्यांतील अश्रू या यशोगाथेची साक्ष देतात.

वाघमारे कुटुंबाने सुधीर मुनगंटीवार यांचे विशेष आभार मानले आहेत. मंगेश वाघमारे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना आ. मुनगंटीवार यांना देवदूत म्हटले आहे. 'आमच्यासाठी आ.सुधीर मुनगंटीवार देवदूत ठरले आहेत. त्यांच्या मदतीशिवाय हे शक्य झाले नसते. आरोग्य सेवेत मानवी दृष्टीकोन व संवेदनशील नेतृत्व किती महत्त्वाचे असते याचे हे उत्तम उदाहरण आहे. प्रत्यक्ष भेट घेऊन आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे आभार व्यक्त करणार आहो,' अशा भावना मंगेश वाघमारे यांनी व्यक्त केल्या.

# संविधानाचा अमृत महोत्सव ज्ञानमंदिर विद्यालयात साजरा

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.१३, मुंबई :** ज्ञानमंदिर विद्यालय, पवई येथे विविध विषयांवर तज्ज्ञ व्याख्यात्यांना आमंत्रित करण्यात आले होते. सध्या संविधानाचा अमृत महोत्सव संपूर्ण देशभर संपन्न होत असताना याच विषयाच्या अनुषंगाने झुनझुनवाला कॉलेज, घाटकोपर मधील तज्ज्ञ व्याख्याते आदरणीय डॉ.भूषण आरेकर यांना व्याख्यानासाठी ज्ञानमंदिर विद्यालय, पवई येथे विशेष आमंत्रण देण्यात आले होते. सदर व्याख्यानला विशेष अतिथी म्हणून रोटरी क्लब ऑफ वर्तक नगर, ठाणे येथील सर्व संचालक मंडळ आवर्जून उपस्थित होते. याशिवाय सोबत पवई विद्यानिकेतन शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी यांची लक्षवेधी उपस्थिती होती. सदर व्याख्यानासाठी ज्ञानमंदिर माध्यमिक विद्यालयातील ८०



विद्यार्थी व २० शिक्षक उपस्थित होते. शाळेच्या प्रांगणातील सरस्वती प्रतिमेला प्रमुख अतिथींच्या हस्ते पुष्पहार घालून कार्यक्रमाचा श्री गणेशा करण्यात आला. तर सन्माननीय व्याख्यात्यांच्या हस्ते संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून वंदन करण्यात आले.

प्रास्ताविकाद्वारे माननीय व्याख्याते व प्रमुख अतिथी यांचा परिचय देऊन संस्था पदाधिकाऱ्यांच्या हस्ते स्वागत व सत्कार सन्मान चिन्ह, शाल, भेटवस्तू व तुळशी रोप देण्यात आले.तज्ज्ञ व्याख्याते डॉ.भूषण आरेकर यांनी आपल्या व्याख्यानाद्वारे संविधान सभा स्थापना, संविधान निर्मितीतील आव्हाने, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची निवडीची कारणे, प्रचंड अभ्यासाद्वारे बनवले गेलेले संविधान, संविधानाची मूलतत्त्वे व गाभा घटक, संविधानाच्या यशस्वीते पाठीमागील महत्त्वपूर्ण घटक, अनेक विविधतेत सामंजस्य साधण्यासाठी संविधानाची उपयुक्तता असे एक ना अनेक मुद्दे घेऊन संविधानावर सखोल विचार मांडले. सर्व श्रोता समुदाय संपूर्ण व्याख्यानात गुंग होता. विद्यार्थ्यांच्या काही प्रश्नांची उत्तरे देऊन सुयोग्य शंका निरसन ही करण्यात आले. याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून उपस्थित रोटरी क्लब ऑफ वर्तक नगर- ठाणे अध्यक्ष व कार्यवाह यांनी शाळा व विद्यार्थी यासाठी भरीव मदत करण्याचे आश्वासन दिले. माननीय मुख्याध्यापक यांच्या माध्यमातून आभार प्रदर्शन संपन्न होऊन कार्यक्रमाचा समारोप झाला. 'संविधानाचा अमृत महोत्सव' या नितांत सुंदर व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे आयोजन पवई विद्यानिकेतन शिक्षण संस्था सभासद सन्माननीय डॉ.यतिन राणे यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते.

# पनवेल महानगरपालिकेच्यावतीने नागरिकांच्या सुविधांच्या विविध विकास कामाचा शुभारंभ

## सेवेची हमी देण्यास पनवेल महापालिका अग्रेसर - आमदार ठाकूर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, पनवेल :** मुख्यमंत्री महोदयांनी कायमच ई गव्हनर्स ला प्रोत्साहन दिले आहे. त्यादृष्टीने इज ऑफ डूइंग बिझनेस ला चालना देण्यासाठी एक शहर एक ॲप पनवेल कनेक्ट' ॲपच्या माध्यमातून पनवेल महापालिका नागरिकांना विविध सुविधा ऑनलाईन देत आहे. आयुक्तांनी हे ॲप नागरिकांसाठी उपलब्ध करून दिले, सेवेची हमी देण्याच्या दृष्टीने महापालिकाने अग्रेसर राहून, उत्तम पाऊल उचलले, सेवा केंद्रे उभारली. या सर्व उपक्रमांच्या माध्यमातून मनपा कार्यक्षेत्रातील प्रत्येकला पालिका ही आपली वाटली पाहिजे यासाठी महापालिका प्रयत्न करत आहे. याबद्दल महापालिकेचे व आयुक्तांचे अभिनंदन, असल्याचे गौरवोद्गगार आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवार, दिनांक १३ एप्रिल २०२५ रोजी येथे काढले.

महापालिकेच्यावतीने लोकनेते दि.बा पाटील विद्यालयामध्ये रविवार, दिनांक १३ एप्रिल २०२५ रोजी पनवेल कनेक्ट ॲप, स्वच्छता विभागाकडील गाड्यांचे लोकार्पण, माहिती प्रसारण डिजीटल बोर्डचे अनावरण सोहळा, महा-ई सेवा हमी केंद्राचे उद्घाटन तसेच भव्य रोजगार मेळाव्याचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, माजी नगरसेवक व माजी नगरसेविका,शिवसेना जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे, भाजप जिल्हा रायगड प्रमुख अविनाश कोळी, अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, उपायुक्त सर्वश्री कैलास गावडे, डॉ.वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर,




उपायुक्त मंगला माळवे, उपायुक्त स्वरूप खारगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ.राजू पाटोदकर, सर्व विभाग प्रमुख, अधिकारी उपस्थित होते.

आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे मार्गदर्शन करताना आयुक्त मंगेश चितळे यांनी पारदर्शक, लोकाभिमुख, गतिमान प्रशासन करण्याच्या अनुषंगाने महापालिका प्रयत्न करत आहे, असे सांगितले. याचबरोबर सेवा हमी कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने तसेच ई गव्हनर्सच्या दृष्टीने मनपाने महत्वाचे पाऊल टाकले आहे. यासाठी महापालिकेने महा ई सेवा केंद्र सुरू केली आहेत. तसेच नागरिकांच्या प्रत्येक अर्जाची दखल घेऊन त्यावर ताबडतोब उपाय योजना करण्याच्या दृष्टीने महापालिकेने पनवेल कनेक्ट ॲप लॉन्च केले आहे. या ॲपच्या माध्यमातून नागरिक व मनपा यांच्यामध्ये सुसंवाद साधला जाईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. रोजगार मेळाव्यासाठी आलेल्या उमेदवारांनी अत्यंत विश्वासाने व धैर्याने मुलाखतीस सामोरे जाऊन नोकरी मिळवावी असा सल्ला व शुभेच्छा यावेळी त्यांनी दिल्या.

शासनाने दिलेल्या १०० दिवसीय कृती आराखड्यांतर्गत सात कलमी कार्यक्रमांवर आधारित विविध योजनांचे आजच्या कार्यक्रमांत उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कैलास गावडे यांनी केले. प्रास्ताविकातून त्यांनी होत असलेल्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली.तर आभार प्रदर्शन अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला. निषकेन फाऊंडेशनच्या सहकार्यातून महापालिकेने या भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन केले होते.

**पनवेल कनेक्ट ॲप -**

पनवेल कनेक्ट ॲप हा एक मोबाइल ॲप्लिकेशन आहे. हे ॲप मुख्यतः पनवेल शहरातील रहिवाशांसाठी डिझाइन केलेले आहे, पनवेल कनेक्ट ॲप रहिवाशांमध्ये महानगरपालिका प्रशासनाशी संवाद सुलभ करते.

या ॲपच्या माध्यमातून पनवेल शहरातील रहिवाशांसाठी संवाद, सेवा विनंती आणि विविध कार्ये सुलभ करण्यात येणार आहे. हे ॲप प्रामुख्याने नागरीकांना सेवा देण्यासाठी तसेच बिल भरणे, स्थानिक बातम्या आणि नागरी इन्फ्रास्ट्रक्चरशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी वापरला जातो. आपत्कालीन सेवा: ॲप आपत्कालीन सेवा जसे की अग्निशामक, पोलिस, किंवा ॲम्ब्युलन्ससाठी यासाठीही देखील हे ॲप उपयुक्त ठरणार आहे.या ॲपचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

**स्वच्छता विभागाकडील गाड्यांचे लोकार्पण -**

पनवेल महानगरपालिकेने घनकचरा संकलन व वाहतूक प्रक्रियेसाठी अत्याधुनिक रिफ्युज कॉम्पॅक्टर १६ वाहनांची खरेदी केली आहे. या वाहनांचा उपयोग महापालिका हद्दीतील घनकचरा संकलन करून घोट येथील क्षेपणभूमीवर वाहतूक करण्याकरिता होणार आहे.

पशु संवर्धनासाठी दोन फिरत्या प्राण्यांच्या दवाखान्याचे लोकार्पण यावेळी करण्यात आले. या गाड्यांचे उद्घाटन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. नागरिकांना महापालिकेच्या विविध उपाय योजनांची माहिती व्हावी यासाठी माहिती प्रसारण डिजीटल बोर्ड बसविण्यात येणार आहेत याचेही अनावरण या कार्यक्रमात करण्यात आले.

या बरोबरच विविध सेवा देण्याच्या दृष्टीने महापालिका कार्यक्षेत्रात चार महा-ई सेवा हमी केंद्रे सुरू करण्यात येणार आहे,याचेही उद्घाटनही यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. नागरिकांना मिळणाऱ्या प्रशासकिय सोयी सुविधा अधिक पारदर्शक, प्रभावी आणि जबाबदार बनविण्यसाठी महापालिकेने ई-ऑफिस प्रणाली सुरू केली आहे. याचेही उद्घाटन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# थोडक्यात

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवाचा आरंभ

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१३, नागपूर :** सावनेर तालुक्यातील भानेगाव येथीलनवीन बिना बौद्ध विहारात भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ आणि राहुल नवयुवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९८ व्या जयंतीचे औचित्य साधत विश्वरत्न भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३४ व्या जयंती महोत्सवाचा आरंभ थाटामाटात करण्यात आला. सकाळी जागेश्वर वानखेडे व बेबीताई वानखेडे यांच्याहस्ते ध्वजारोहण (निळा झेंडा) करण्यात आले. सायंकाळी उद्घाटनीय कार्यकमात तथागत गौतम बुद्ध, महात्मा ज्यातीबा फुले यांच्या छायाचित्राला तर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व त्यागमूर्ती माता रमाईच्या पूर्ण पुतळ्यांना माल्यार्पण व बुद्ध वंदना घेवून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. भारतीय बौद्ध महासभा नवीन बिना अध्यक्ष डॉ.जितेंद्र तागडे यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट करताना महोत्सवात घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती देताना बुद्ध, अशोक, कनिष्क, छत्रपती शिवाजी, फुले-शाहू-आंबेडकर यांच्या पद चिन्हावर चालण्याचा सल्ला दिला. महोत्सवाचे उद्घाटन पूजनीय भन्ते महेंद्ररत्न, सचिव राष्ट्रीय सर्वधर्म सद्भावना व मार्गदर्शक भारतीय बौद्ध महासंघ उत्तर नागपूर यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकताना वर्ण व्यवस्थेत मनुस्मृती भूमिका स्पष्ट केली. प्रमुख अतिथी शंकरराव ढेंगरे, राष्ट्रीय जनरल सेक्रेटरी व विश्वस्त भारतीय बौद्ध महासंघ यांनी महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे अध्यक्ष चन्द्रबोधी पाटील, राष्ट्रीय अध्यक्ष व विश्वस्त भारतीय बौद्ध महासंघ यांनी महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाची दशा आणि दिशेची माहिती देतांना महाबोधी महाविहार इतर धर्मियांच्या ताब्यातून मुक्त करण्यासाठी तन, मन, धनाने आंदोलनात सहभागी होण्याचे आव्हान केले. सांस्कृतिक कार्यक्रमात धम्म सकाळ सामुहिक नृत्य तर प्राची भूषण दानी यांनी एकपात्री नाटक राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ प्रस्तुत करून कार्यक्रमात रंग भरला. यावेळीधम्मपिठावर चिचोली(खापरखेडा) सरपंच मीनाक्षी तागडे, भानेगांव ग्रामपंचायत सदस्य दर्शना बोरकर, भारतीय बौद्ध महासंघ नवीन बिना उपाध्यक्ष अनिल लांजेवार, सचिव मुकेश बागडे, कोषाध्यक्ष, हिशोब तपासणीस नरेश डोंगरे, रवींद्र ढोके, सल्लगार समितीचे लक्ष्मण लांजेवार, मनोहर गजभिये, भैयाजी सोनटक्के, उदाराम धनवटे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ आणि राहुल नवयुवक संघच्या कार्याकारींचे परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन मालवी नारनवरे तर आभार कल्पना वासनिक यांनी मानले.

## हनुमान जन्मोत्सवनिमित्त श्री साई सेवा मित्र मंडळातर्फे महाप्रसादाचे वाटप

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१३, नागपूर :** सावनेर तालुक्यातील खापरखेडा रेल्वे चौकी येथे श्री साई सेवा मित्र मंडळातर्फे दरवर्षी प्रमाणे यंदा ही हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहाने विविध धार्मिक पूजा अर्चना करून मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. याप्रसंगी सायंकाळी ग्रामस्थांना आलुभात व जलेबीच्या महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. जन्मोत्सव यशस्वीतेसाठी अशोक वंजाळ, हरीश लोडकेर, रमेश राऊत, सुरेश सुर्यवंशी, सूरज राऊत, करण वंजाळ, प्रफुल्ल राऊत, विनीत भड, आदित्य सुर्यवंशी, अंकित लसणकर, सोहन जालंदर, राजू लिखारे ,मुन्ना कनोजे, बबलू कनोजे, दीपक पाहडे, प्रतीक राऊत, आशीष गमे, विजय गोरकर, जैनदास जैन, दिलीप जैन, अरविंद तरारे, निखिल कापसे, शुभम पावडे, हर्षल वाघमारे, दर्शन काकडे, सौरभ भुरे, ऋषिकेश आचार्य, रोहीत बोरीकर, संजय कुंभरे, शुभम झिंगरे, आदींचे विशेष सहकार्य लाभले.

## टाकळी ढोकेश्वर येथे हनुमान जयंती उत्साहात साजरी

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.१२, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळीढोकेश्वर येथील मारुती मंदिर येथे श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ठिक ६ वा. जन्मोत्सवाच्यावेळी मारुती मंदिराचे पुजारी सागर भालेराव (बप्पा) यांच्या हस्ते अभिषेक करुन महापुजा करण्यात आली. दत्त भजनी मंडळाच्या वतीने हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला. पहाटे पासून हनुमान चालीसाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांसह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच मंदिर परिसर फुलांसह आकर्षक सजावट करण्यात आली होती. पहाटेपासूनच अबालवृद्ध भाविकांनी दर्शनासाठी रुईच्या पानांचा हार घेऊन रांगा लागल्या होत्या. यावेळी हिंदवी प्रतिष्ठान व सकल हिंदू समाज टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांच्या वतीने खिचडी प्रसादाचे आयोजन करण्यात होते. सायंकाळी ६ वाजता हनुमान जयंती व रामनवमीचे औचित्य साधून टाकळी ढोकेश्वर गावात भव्य दिव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. सायंकाळी ७ वाजता महाआरती व हनुमान चालीसा पठण करून प्रसाद वाटून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## कृषी विभागाच्या योजनांचा लाभा घेण्यासाठी शेतकरी 'फार्मर आयडी' अनिवार्य

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, अहिल्यानगर :** कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा कृषी लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) अनिवार्य करण्यात आलेला आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभमिळण्यास मदत होईल. तसेच पीक कर्ज, पीक विमा आणि इतर सुविधा सहज उपलब्ध होतील. याबाबतचा शासननिर्णय जारी करण्यात आला आहे. कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभाकरिता शेतकरी ओळखपत्र क्रमांक दिनांक १५ एप्रिल २०२५ पासून अनिवार्य करण्यात येत आहे. कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांसाठी शेतकरी ओळखपत्र क्रमांक अनिवार्य करण्यात आल्याने त्याबाबत सर्व संबंधित पोर्टल, सकेतस्थळे, ऑनलाईन प्रणाली इ. मध्ये सर्व संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून आवश्यक त्या तांत्रिक सुधारणा करण्याची कार्यवाही कृषी आयुक्तांनी करावी. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप शेतकरी ओळखपत्र क्रमांक साठी नोंदणी केलेली नाही त्या शेतकऱ्यांना तातडीने सदर पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी प्रवृत्त करावे. शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळख क्रमांक आवश्यक असल्याबाबत आयुक्त (कृषि) यांचेद्वारे प्रचार, प्रसिद्धी व जनजागृती करण्यात यावी. एकाच वेळी सर्व गावातून या योजनेचा शुभारंभ करण्यात येणार आहे. कृषी संलग्न विभागाच्या योजना सुलभ, पारदर्शक पद्धतीने राबवण्याचा हा प्रयत्न आहे.